आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ जुलै २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नीट युजी २०२४ परीक्षेचा निकाल येत्या शनिवारी जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राष्ट्रीय चाचणी संस्थेला निर्देश
- महाराष्ट्र सरकार नव्या पर्यटन धोरणाद्वारे १८ लाख रोजगार निर्मिती करणार
- उत्तर प्रदेशात चंदीगड-दिब्रूगढ एक्सप्रेसचे डबे रुळावरून घसरल्यानं झालेल्या अपघातात २ जणांचा मृत्यू , २० जखमी
- स्वीडिश खुल्या टेनिस स्पर्धेतून भारताचा सुमित नागल बाहेर

  **आणि**
- देशातल्या शेअर बाजारात नवे उच्चांक, सेन्सेक्स ८१ हजार आणि निफ्टी २४ हजार ८०० च्या अंकांच्या वर बंद

**<><><><><>**

नीट युजी २०२४ परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा निकाल येत्या शनिवारी दुपारी १२ वाजेपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय चाचणी संस्थेला दिले आहेत. नीट युजी परीक्षा घोटाळ्यासंदर्भात दाखल झालेल्या ४० याचिकांची सुनावणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर सुरु आहे. त्यादरम्यान सर्वोच्च न्यायलयाने हे निर्देश दिले. एनटीएने शहर आणि परीक्षा केंद्राच्या तपशिलासह, परीक्षार्थींची ओळख कोणत्याही प्रकारे न दडवता आपल्या संकेतस्थळावर निकाल जाहीर करावा असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

या परीक्षेच्या पावित्र्याशी तडजोड झाली यात शंकेला जागा नाही असा शेरा सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी दरम्यान मारला, मात्र २३ लाखापेक्षा जास्त

विद्यार्थ्यांचं भविष्य अवलंबून असल्याने परीक्षा रद्द करणं हा अखेरचा पर्याय असेल असं स्पष्ट केलं. पुढची सुनावणी येत्या सोमवारी होणार आहे.

**<><><><><>**

नीट-युजी प्रवेश परीक्षा पेपरफुटी प्रकरणी सीबीआय नं आज एम्स-पटणा या संस्थेच्या चार विद्यार्थ्यांना ताब्यात घेतलं. हे विद्यार्थी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाचे असल्याचं एम्स-पटणाचे कार्यकारी संचालक डॉ. जी. के पाल यांनी सांगितलं.

या विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यापूर्वी सीबीआयनं आपल्याला आगाऊ सूचना दिली होती, तसंच आपल्या संस्थेनं तपास यंत्रणेला सहकार्य केलं अशी माहिती त्यांनी दिली. सीबीआयनं या विद्यार्थ्यांचे लॅपटॉप जप्त केले असून त्यांच्या खोल्या सील केल्या आहेत. तसंच त्यांची चौकशी सुरू आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याचं पर्यटन धोरण - २०२४ तयार करण्यात आलं असून याद्वारे राज्यात अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १८ लाख रोजगार निर्मिती करणार आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी आज दिली. दहा वर्षात पर्यटन स्थळं तसंच पायाभूत सुविधा विकसित करुन पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचं उद्दिष्ट असल्याचं महाजन यांनी सांगितलं.

या पर्यटन धोरणानुसार, पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज आणि अनुदान प्रोत्साहन तसंच महिला उद्योजक, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांगांना अतिरिक्त प्रोत्साहन दिलं

जाईल. ग्रामीण आणि शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात उच्चतम दर्जाचं शाश्वत आणि जबाबदार पर्यटन विकसित करण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. राज्यातल्या लघु, मध्यम, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब आणि क, गटांमध्ये विभागलं असून त्यांना गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीच्या आधारे प्रोत्साहन दिलं जाणार आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन नवकल्पना, उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यावर या धोरणात भर देण्यात येईल आणि राज्यातल्या एक खिडकी प्रणालीला केंद्र शासनाच्या मैत्री प्रणालीसह संलग्न केलं जाईल, अशी माहिती महाजन यांनी दिली.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्ली इथं नार्को-कोऑर्डिनेशन सेंटरची ७ वी उच्च स्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. भारतातली अमली पदार्थांची तस्करी आणि गैर वापर रोखण्यासाठी काम करत असलेल्या विविध केंद्र आणि राज्य सरकारी संस्थांच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधणं, हे या बैठकीचं उद्दिष्ट आहे.

अमली पदार्थांच्या समस्येचा सामना करण्यासाठी सरकारनं अमली पदार्थांच्या तस्करी विरोधात शून्य सहनशीलता धोरण स्वीकारल्याचं गृहामंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

संस्थात्मक संरचना मजबूत करणं, अमली पदार्थ विरोधी उपक्रमांमध्ये काम करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये समन्वय वाढवणं आणि व्यापक जनजागृती मोहीम सुरू करणं, या त्रीसूत्रीच्या मदतीनं २०४७ या वर्षापर्यंत भारताला अमली पदार्थ मुक्त करण्याचं सरकरचं उद्दिष्ट असल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जगातल्या पाच सर्वात मोठ्या कोळसा खाणींपैकी दोन खाणी भारतात असल्याचं कोळसा मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. गेवरा आणि कुसमुंडा या दोन खाणी जगातल्या सर्वात मोठ्या कोळसा खाणींमध्ये अनुक्रमे दुसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर असून, त्या कोल इंडियाची उपकंपनी असलेल्या साऊथ ईस्टर्न कोलफिल्डस लिमिटेड या कंपनीच्या ताब्यात आहेत. या दोन खाणी एकत्रितपणे वर्षाला १०० दशलक्ष टन पेक्षा जास्त कोळसा उत्पादन करत असून भारताच्या एकूण कोळसा उत्पादनाच्या ते १० टक्के इतकं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निवडक भाषणांचं संकलन असलेल्या "विंग्ज टू अवर होप्स - खंड एक" या पुस्तकाचं आज राष्ट्रपती भवनात प्रकाशन करण्यात आलं. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्या उपस्थितीत पुस्तकाच्या ई-आवृत्तीसह इंग्रजी आणि हिंदी आवृत्तीचं प्रकाशन केलं. "कहानी राष्ट्रपती भवन की" आणि "राष्ट्रपती भवन-हेरिटेज मीट्स द प्रेझेंट" या दोन पुस्तकांचंही प्रकाशन यावेळी करण्यात आलं.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या मानकापूर विभागातल्या गोंडा रेल्वे स्थानकाजवळ आज चंदीगड-दिब्रूगढ एक्सप्रेसचे २३ पैकी २१ डबे रुळावरून घसरले. या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी झाले. रेल्वे मंत्रालयानं मृतांच्या कुटुंबाना प्रत्येकी १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये. तर किरकोळ जखमींना

प्रत्येकी ५० हजार रुपये मदत शासनानं जाहीर केली असून, या अपघाताच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

या अपघातामुळे लखनऊ ते गुवाहाटी रेल्वे मार्गावरल वाहतूक ठप्प झाली असून अनेक रेल्वे गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मदत आणि बचावकार्य अधिक वेगानं व्हावं असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सर्व अपघातग्रस्तांना बस आणि इतर वाहनांच्या साहाय्यानं मानकापूर रेल्वे स्थानकात सुरक्षित पोहोचवण्यात आलं आहे. या अपघाताची कारणं शोधण्यासाठी चौकशी सुरु आहे. रुळावरून घसरलेल्या बोगीमध्ये कोणतेही प्रवासी अडकलेले नाहीत, अशी माहिती रेल्वे प्रशासनानं दिली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात छत्तीसगडच्या सीमेलगतच्या जंगलात काल पोलिसांबरोबरच्या चकमकीत दोन दलमचा बीमोड झाल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाले होते. त्यांच्यावर एकूण ३० लाख रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईमुळे उत्तर गडचिरोलीत सक्रिय असलेल्या ‘टिपागड एलओएस’ आणि ‘चातगाव-कसनसूर’ या नक्षल्यांच्या दोन दलमचा बीमोड झाला. या चकमकीत जखमी झालेल्या पोलिसांवर नागपूरच्या रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पंढरपुरातून जालना इथं परतणाऱ्या भाविकांच्या जीपचा जालना - राजूर मार्गावर अपघात झाला. दुचाकीसोबत धडक बसून जीप विहिरीत पडल्यामुळं पाच

जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले. जखमींना जालना इथं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अपघातग्रस्त जीप अद्याप विहिरीतच असून पाच भाविकांचे मृतदेह काढण्यात आले आहेत. अद्यापही काही प्रवासी जीपमध्ये अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

**<><><><><>**

स्वीडिश खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या सुमित नागलला आज सरळ सेट्समधे पराभूत झाल्यानं स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं. पुरुष एकेरीच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिनाच्या मारियानो नावोननं त्याला ६-४, ६-२ असं पराभूत केलं. त्याआधी पुरुष दुहेरीतही त्याला त्याचा पोलीश जोडीदार कॅरोल ड्रझेविकी यांना पराभव पत्करावा लागला. फ्रान्सच्या अलेक्झांडर म्युलर आणि लुका वॅन हॅशे या जोडीनं त्यांच्यावर ६-३, ६-४ अशी सरळ सेट्समधे मात केली.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात आजही तेजी दिसून आली आणि नवे विक्रम प्रस्थापित झाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज पहिल्यांदा ८१ हजार अंकांची पातळी ओलांडण्याचा आणि ८१ हजाराच्या वर बंद होण्याचा विक्रम नोंदवला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही पहिल्यांदाच २४ हजार ८०० च्या पलीकडे जाऊन बंद झाला. सुरुवातीची घसरण भरुन काढत दोन्ही निर्देशांकांनी दिवसअखेर तेजीकडे वाटचाल केली. दिवसअखेर सेन्सेक्स ६२७ अंकांची वाढ नोंदवून ८१ हजार ३४४ अंकांवर आणि निफ्टी १८८ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार ८०१ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधात विरोधकांकडून वापरले जाणारे शब्द ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचं सांगत केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी विरोधकांवर टीका केली. सार्वजनिक जीवनात शब्दांची निवड खूप महत्त्वाची असते. त्यामुळे विरोधकांनी असंसदीय शब्द टाळावेत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

येत्या पाच दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, गुजरात, आणि कर्नाटकच्या किनारपट्टी आणि अंतर्गत भागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. येत्या १९ आणि २० जुलै रोजी आंध्रप्रदेशचा किनारपट्टी भाग आणि तेलंगणामध्ये यानम इथं तुरळक ठिकाणी अती मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**